झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां३/५३२५-४/२०२५
दिनांक २४ /११/२०२५.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये)

प्रस्तावना :

मौजे पिंपरी वाघेरे, सि.स. नं.५०२०पै, ५०२०/२पै, ५०२०/३ व ५१९६ पै,साईबाबा वसाहत, नेहरूनगर येथील झोपडपट्टी संदर्भात १९५०.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०५/१०/२०२३ रोजी सदर मिळकतीवरील प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्रस्तावाची छाननी करून झोपडीधारकांच्या ८२.९२% हून जास्त संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत दाखल प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि.१७/१०/२०२५ रोजी मंजूर नियमावली २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/ सूचना अथवा तक्रार प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

१) दि.१७/१०/२०२५ रोजी निर्गमित केलेल्या प्रारूप योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव करून सदर प्रारूप योजना अंतिम करण्यात येत असून सदर योजनेस प्रारूप योजनेतील सर्व शर्ती-अटीसह प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेत आवश्यकतेप्रमाणे होणारे बदल झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस /प्रतिनिधींना वेळोवेळी अवगत करणे विकसकावर बंधनकारक राहील.

२) सदर योजनेद्वारे विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, विकसकांनी झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व नियमावली २०२२ मधील तरतूदीस अधिन राहून योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी विकसकाची राहील.

३) सदर योजनेचे विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे तसेच अन्य सर्व संविधानिक प्राधिकरणे व झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम लागू राहतील.अशा सर्व प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशांचे/आदेशाचे अनुपालन करणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) झोपडपट्टी अधिनियमातील कलम ३ (ड) अन्वये झोपडपट्टी निर्मुलनाचे आदेश पारीत झाल्यानंतर, योजनेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या बांधकाम प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

५) सदर योजना क्षेत्रात निर्मुलन आदेश पारित झाल्यानंतर विकसकास झोपडीधारकांना दरमहा भाडे दि.१४/०२/२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार देणे बंधनकारक असेल.

६) सदर योजनेत सद्यस्थितीत कलम ३(क) नुसार घोषित केलेल्या क्षेत्रांतर्गत संरक्षित असलेली सर्व सार्वजनिक (धार्मिक स्थळे) यांचे पुनर्वसन प्रचलित शासन निर्देशानुसार पुनर्वसन योजनेत प्रयोजन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील. बांधकाम परवानगीपूर्वी सदर बाबींची पडताळणी करणे आवश्यक राहील.

७) या विभागाकडील विषयांकित मिळकतीसंदर्भातील दि.१७/०९/२०२५ रोजीच्या अभिप्रायामध्ये परिच्छेद क्र. ६ मध्ये नस्तीत दाखल मौजे पिंपरी वाघेरे (नेहरूनगर), तालुका - हवेली, जि-पुणे सि.स.नं. ५०२०, ५०२०/२, ५०२०/३ व ५१९६ या मिळकतीच्या दि. ०२/०९/२०२५ व ०३/०९/२०२५ रोजीच्या मालमत्ता पत्रकाचे अवलोकन करता, खालील दर्शवलेल्या तक्त्याप्रमाणे मालमत्ता पत्रकी एकूण क्षेत्राची नोंद असून विकसकाने खरेदी केलेल्या क्षेत्राचे मालमत्ता पत्रकी अद्याप नोंद झालेली नाही, असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने विकसक यांनी दि. ०६/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मालमत्ता पत्रक विषयांकित योजनेस जोते पूर्णत्व प्रमाणपत्र प्रदान करणेपूर्वी अद्ययावत करून देवू असे कळविले आहे. सबब विकसक यांनी सदर मालमत्ता पत्रक विषयांकित योजनेस जोते पूर्णत्व प्रमाणपत्र प्रदान करणेपूर्वी किंवा ३ महिन्याच्या कालावधीत अद्ययावत करणे विकसक यांना बंधनकारक राहील.

८) सदर प्रकरणी विकसक यांनी भूखंडातील पात्रता यादी मधील ०१ अपात्र बिगरनिवासी गाळा प्रस्तावित करण्यात आलेला नाही. भविष्यात अपात्र झोपडीधारक पात्र ठरल्यास बिगरनिवासी गाळा देणे विकासकावर बंधनकारक राहील.

९) विषयांकित भूखंडावर बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेबाबत लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करून परिपत्रक क्र.०६/२०२४ दि.०२/०९/२०२४ नुसार १६२ पुनर्वसन सदनिकांची योजना बांधकाम परवानगी प्राप्त झाले पासून ४२ महिन्यात पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील.

प्रस्तुत निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे झाल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे दाखल करता येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रशासकीय मान्यता ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-१४/११/२०२५

१४/११/२०२५

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

सतीशकुमार द. खडके (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स , सि.स.नं.५०२७ प्रजोल आशियाना,नुरानी मजीद जवळ, नेहरूनगर पिंपरी,पुणे- ४११०१८.

\\TECHNICAL3-PC\D\PRASAD-T3\5020 SAIBABA VASAHAT, NEHRUNAGAR, PIMPARI PRASTAV\14.6.12(1) अंतिम योजना ORDER.DOC